वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या नियत्रंणाखालील शासन अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांची देयके "आयुर्वेदार्थ" प्रणालीव्दारे अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१८१/आयु-२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ९ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४००००१.
दिनांकः १४ फेब्रुवारी, २०१३

संदर्भः- १) वित्त विभागाचे क्र.संकीर्ण१००७/प्र.क्र.११२/भाग-३/कोषा-प्र-५, दि.२८.०९.२०१२ चे पत्र.

२) शासन निर्णय क्रं.संकीर्ण१०१०/प्र.क्र.६८/कोषा-प्र-५, दि.१८.०४.२०११

३) वैद्यकीय शिक्षण व औषधीं द्रव्ये विभागाचे अनुक्रमे परिपत्रक व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.७/१२/आस्थापना, दि.०९.१०.२०१२ व दि.०५.११.२०१२.

**प्रस्तावनाः**

राज्यातील शासन अनुदानित खाजगी १६ आयुर्वेद, ३ युनानी व १ संलग्न रुग्णालय तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व हाफकीन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई येथील कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते अदा करण्याकरीता शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये या प्रशासकीय विभागामार्फत सहाय्यक अनुदान देण्यात येते. सदर संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांचे सद्यःस्थितीत वेतन अदा करण्याबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे.

अ) (१) या विभागाच्या अधिपत्याखालील शासन अनुदानित १६ आयुर्वेद, ३ युनानी व १ संलग्न रुग्णालय येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते अदा करण्याकरीता संबंधित संस्था दरमहा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा तपशिल सहाय्यक संचालक, आयुर्वेद कार्यालयाकडे सादर करतात. सहाय्यक संचालक त्यांच्या नियत्रंणाखालील संस्थेच्या वेतनाचा तपशिल संचालक, आयुर्वेद कार्यालयास सादर करतात. तद्नंतर संचालकांकडून संस्थानिहाय एकत्रित वेतनाचा तपशिल वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास सादर केला जातो. वेतनाचा तपशिल प्राप्त झाल्यानंतर तेवढया रकमेचा मंजूरीचा आदेश विभागाकडून निर्गमित केला जातो.

(२) उपरोक्त प्रमाणे शासन आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित सहाय्यक संचालक तेवढया रकमेचे देयक कोषागारात सादर करतात. कोषागारात देयकाची तपासणी करुन तेवढया रकमेचा धनादेश सहाय्यक संचालक यांना प्राप्त होतो. धनादेश प्राप्त झाल्यानंतर सहाय्यक संचालक हे सदर धनादेश संबंधित संस्थेतील प्राचार्य व [illegible]

खात्यात जमा केला जातो. तद्नंतर शिक्षक व शिक्षकेत्तर यांची यादी व वेतनाचा तपशिल बॅकेत दिल्यानंतर बॅक संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतनाची रक्कम जमा करते.

ब) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच हाफकीन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाचा तपशिल सादर करुन तेवढयाच रकमेची मागणी संबंधित संस्थेकडून विभागाकडे केली जाते. तेवढया रकमेचे शासन मंजूरी आदेश विभागाने काढल्यानंतर सदर रक्कम BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येते. मंजूरी आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेतील लेखा अधिकारी तेवढया रकमेचे देय अधिदान व लेखा अधिकारी, कोषागार कार्यालयात सादर करतात. सदर देयकाची तपासणी करुन अधिदान व लेखा कार्यालयात त्याचा धनादेश लेखा अधिकारी यांचेकडे देतात. सदर धनादेश लेखा अधिकारी संस्थेच्या खात्यात जमा करतात. सदर जमा केलेल्या रकमेतून अधिकारी, कर्मचारी यांच्या वैयक्तिक खात्यात वेतनाची रक्कम जमा करण्यात येते.

क) शासनामार्फत वेळच्यावेळी वेतन अनुदान उपलब्ध करुन दिल्यानंतरही संबंधित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांच्या खात्यात जमा होण्यास तांत्रिक कारणामुळे विलंब होतो. शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतन प्रदान कार्यपध्दतीमध्ये पारदर्शकता आणणे तसेच प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस वेतन अदा करता यावे म्हणुन राज्यातील शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन व भत्ते यांची देयके "सेवार्थ" या नवीन वेतन प्रणालीव्दारे तयार करण्यात येतात त्या प्रणालीव्दारे अथवा त्यात आवश्यक सुधारणा करुन नवीन प्रणालीव्दारे प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त व अनुदानित खाजगी महाविद्यालये, विद्यापीठे व इतर संस्थातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाची देयके तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच हाफकीन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई येथील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन व भत्ते सुधारीत केलेल्या "आयुर्वेदार्थ" या नवीन प्रणालीव्दारे तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील शासन अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचांऱ्यांचे वेतन व भत्त्यांची देयके "आयुर्वेदार्थ" या संगणकीय प्रणालीव्दारे अदा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या "आयुर्वेदार्थ" संगणक प्रणालीमार्फत माहे फेब्रुवारी -२०१३ चे माहे मार्च-२०१३ मध्ये देय असलेले वेतन व भत्ते यांची देयके काढण्यात यावीत, असे आदेश या शासन निर्णयाव्दारे देण्यांत येत आहेत.

२. "आयुर्वेदार्थ" या संगणकीय प्रणालीमध्ये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या नियत्रंणाखालील शासन अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचांऱ्यांची आवश्यक सर्व माहिती भरण्याचे (DATA ENTRY) काम पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी खालीलप्रमाणे सोपविण्यात येत आहे.

अधिकाऱ्यानी प्रणालील बदल केल्यानंतर देयक / बदलांच्या पत्रकाची प्रत (Change Statement) मुद्रित करुन त्यावर स्वाक्षरी करुन आणि त्यांस आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून ते रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे सादर करावे. याआधारे रकाना क्र.४ मधील अधिकाऱ्यांनी प्रणालीत दर्शविलेले बदल मान्य करुन एकत्रिकरणाची कार्यवाही करावी.

३. "आयुर्वेदार्थ" प्रणालीमध्ये एकदा भरलेली माहिती ही अंतिम राहील. त्यामध्ये पुन्हा बदल करता येणार नाही. माहितीमध्ये बदल करावयाचा झाल्यास तसा समर्थनात्मक प्रस्ताव शासनास सादर करावा. आवश्यकतेप्रमाणे तसे बदल शासनस्तरावरुन केले जातील.

४. "आयुर्वेदार्थ" प्रणालीव्दारे अदा करण्यात येणारे कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन यापुढे संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / कुलसचिव / संचालक यांचेमार्फत न करता थेट संबंधित कोषागार कार्यालयामार्फत संबंधित कर्मचाऱ्यांच्या बॅक खात्यात ECS व्दारे जमा करावे अथवा कोषागाराने संबंधित संस्थेच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बॅक खात्यात ECS व्दारे जमा करावी व तद्नंतर त्यांनी ते थेट ECS व्दारे कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करावी.

५. यापुढे अनुदानित संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन ECS व्दारे संबंधित कर्मचाऱ्यांच्या बॅक खात्यात जमा होणार असल्याने कर्मचाऱ्यांच्या बॅकखात्याबदद्लची अधिकृत माहिती संबंधित संस्थेकडे असणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित आयुर्वेद / युनानी / महाविद्यालयाचे प्राचार्य व संबंधित संस्थांचे कुलसचिव / संचालक यांनी "परिशिष्ट-अ" मध्ये दर्शविल्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांकडून आवश्यक ते प्रमाणपत्र त्यांच्या स्वाक्षरीनिशी प्राप्त करुन घ्यावे व ते संग्रही ठेवावे. तसेच संबंधित संस्थेने त्यांच्या अखत्यारितील कर्मचाऱ्यांचे "परिशिष्ट-अ" मधील प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन ते संग्रही ठेवण्यात आल्याचे "परिशिष्ट-ब" नुसार प्रमाणपत्र संबंधित रकाना क्र. ४ मधिल अधिकाऱ्याकडे सादर करावे.

६. "आयुर्वेदार्थ" या संगणकीय प्रणालीमध्ये माहिती भरल्यानंतर उपरोक्त परिच्छेदातील कार्यक्षेत्रातील सर्व आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांच्या तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई वेतन देयकाकरीता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरुन घेण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांकडून सही व शिक्क्यानिशी प्राप्त होणाऱ्या माहितीची मुद्रीत प्रत उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन पडताळणी करुन संबंधित प्रतिस्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे सादर करावेत. सदर माहिती भरणे व त्याची पडताळणी करण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत

| अ.क्र. | संस्थांचे प्रकार | वेतन देयकेकरीता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरण्यासाठी (DATA ENTRY) प्राथमिक, जबाबदार आणि प्रमाणित करुन माहिती सादर करणारा अधिकारी | कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांचे वेतन देयकाकरिता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरुन घेण्यासाठी आणि ती अचूक आहे हे प्रमाणित करण्यासाठी जबाबदार अधिकारी. | या संपुर्ण कामा करीता पर्यवेक्षक / संनियत्रंक आणि प्रमाणपत्रावर प्रतिस्वांक्षरी करणारा अधिकारी. |
|---|---|---|---|---|
| १ | शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालय व संलग्न रुग्णालय. | संबंधित महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी किंवा अधिक्षक तथा लेखाविषयक काम पाहणारे अधिकारी | संबंधित सहाय्यक संचालक आयुर्वेद. | संबंधित सहाय्यक संचालक आयुर्वेद. |
| २ | आरोग्य विज्ञान विद्यापीठ | कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई, कोकण भवन, बेलापूर | संबंधित सहाय्यक संचालक आयुर्वेद. |
| ३ | हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई | संचालक, हाफकीन संस्था, परेल, मुंबई. | सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई, कोकण भवन, बेलापूर | संबंधित सहाय्यक संचालक आयुर्वेद. |

शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील प्राचार्य व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई या संस्थेच्या रकाना क्र.३ मध्ये दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सर्व आवश्यक ती माहिती "आयुर्वेदार्थ" मध्ये भरावी व तसे प्रमाणपत्र सादर करुन ती माहिती उपरोक्त रकाना क्र.४ मधील जबाबदार अधिकाऱ्यास सादर करावी. त्या अधिकाऱ्याने त्याची पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र द्यावे व त्यावर रकाना क्र.५ मधील अधिकाऱ्याने भरलेली माहिती तपासुन प्रमाणपत्रावर प्रतीस्वाक्षरी करावी. उपरोक्त तक्त्यातील रकाना क्र.३ मध्ये दर्शविलेले अधिकारी आपल्या संबंधित संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या संदर्भात होणारे मासिक बदल प्रणालीत दरमहा नोंदवतील. रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेले अधिकारी अशा सर्व संबंधित संस्थाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. आहरण व संवितरण अधिकारी या नात्याने संबंधित संस्थांकडून प्रणालीवर प्राप्त होणाऱ्या देयकांचे एकत्रिकरण करुन महाराष्ट्र कोषागार नियमातील नमुना क्र. ४४ मध्ये एकत्रित रकमेचे देयक प्रणालीव्दारे

फेब्रुवारी, २०१३ पर्यंत पुर्ण करण्यात यावी. उपरोक्त क्र.२ येथील परिच्छेदामधील तक्त्यात क्र.४ या रकान्यात दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी प्रणालीतून तयार होणारे प्रमाणपत्र मुद्रित करुन घ्यावे व त्यावर स्वाक्षरी करुन कार्यालयीन शिक्का उमटवून ते रकाना क्र.५ मधील अधिकाऱ्यांकडे सादर करावे. रकाना क्र.५ मधील अधिकाऱ्यांनी त्याची एक प्रत स्वतःकडे ठेऊन दुसरी प्रत संबंधित प्रतिस्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे पाठवावी. संचालनालय / महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव / हाफकिन संस्थेचे संचालक यांनी त्याची एक प्रत स्वतःकडे ठेऊन दुसरी प्रत शासनास सादर करावी.

७. उपरोक्त परिच्छेद २ मधील तक्त्यातील रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या सांकेतांकाने या प्रणालीमध्ये प्रवेश करुन संबंधित संस्थांची माहिती तपासून मान्य (**Approve**) करावी. अशाप्रकारे माहिती मान्य केल्याशिवाय संबंधित संस्थांना पुढील कार्यवाही करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. "आयुर्वेदार्थ" या प्रणालीमध्ये माहिती भरणे, सदर प्रणाली हाताळणे आणि त्याव्दारे वेतन देयक तयार करणे इत्यादी बाबत प्रशिक्षण देण्याकरीता मास्टर ट्रेनरची निवड संचालक, आयुर्वेद संचालनालय / महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव / हाफकिन संस्थेचे संचालक यांनी करावी. सदर मास्टर ट्रेनर्सना प्रथम टप्प्यात मेसर्स टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस यांच्या कर्मचांऱ्यांकडून सर्वसमावेशक प्रशिक्षण देण्यात येईल. मास्टर ट्रेनर्सनी पुढे त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करावी. यांबाबतचा सविस्तर कार्यक्रम संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई यांनी तयार करुन राबवावा. या योजनेवर संनियत्रंण ठेवणे आणि ती परिणामकारकरित्या राबविण्याची जबाबदारी संबंधित संचालक, आयुर्वेद संचालनालय यांची राहील.

९. माहे फेब्रुवारी,२०१३ चे देय असलेले वेतन मार्च,२०१३ मध्ये अदा करण्याकरिता "आयुर्वेदार्थ" प्रणालीवर तयार केलेल्या वेतन देयकाबरोबर सध्याच्या प्रचलित कार्यप्रणाली प्रमाणे हाताने तयार केलेली देयके तपासावी आणि त्यात काही तफांवती नाहीत याची खात्री करावी व त्यानंतर ती कोषागार कार्यालयाकडे सादर करावीत. मात्र सध्याच्या कार्यपध्दतीनुसार तयार केलेले वेतन आयुर्वेदसेवार्थ प्रणालीवर सादर केल्याशिवाय संबंधित कोषागार कार्यालयाकडून स्वीकारले जाणार नाही. माहे फेब्रुवारी,२०१३ चे माहे मार्च,२०१३ मध्ये देय असणाऱ्या वेतना पासून पुढील देयके मात्र केवळ "आयुर्वेदार्थ" या प्रणालीव्दारे तयार करुन कोषागाराकडे सादर करावीत.

अनुदानाच्या रकमेकरीता BEAMS या प्रणालीवर संपूर्ण वर्षाकरिता महिनानिहाय अनुदान उपलब्ध करुन दिले जाईल. त्यामुळे प्रत्येक महिन्याचे अनुदान वितरणासंदर्भातील शासन आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता राहणार नाही.

११. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच हाफकीन प्रशिक्षण व संशोधन संस्था, परेल, मुंबई या संस्थासाठी वेतनाकरीता दिले जाणारे सहाय्यक अनुदान नियंत्रक अधिकारी संचालक आयुष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्रशासकीय विभागाकडून ३६ सहाय्यक अनुदान अंतर्गत उपलब्ध करुन दिले जाईल. तद्नंतर संचालक आयुष कार्यालयाकडून संबंधित सहाय्यक संचालक आयुर्वेद यांना मासिक निधी विवरणपत्राव्दारे उपलब्ध करुन दिले जाईल.

(अ) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच हाफकीन प्रशिक्षण व संशोधन संस्था, परेल, मुंबई यांच्या लेखा शिर्षामधून वेतन व भत्ते काढण्यासाठी सहाय्यक संचालक आयुर्वेद, कोकण भवन, बेलापूर यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

१२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक सं.क्र.८/१३/कोषा-५, दिनांक १७.०१.२०१३ अन्वये दिलेल्या मान्यते नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(हि.रा. सूर्यवंशी)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक.
२) मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक.
३) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव, लेखा व कोषागारे, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
६) सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
७) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
८) सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
९) सहसचिव (आयुर्वेद), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) उपसचिव (आस्थापना), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई, शासकीय दंत महाविद्यालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई.

१२) सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई / पुणे / नागपूर.

१३) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.

१४) संचालक, हाफकीन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, मुंबई.

१५) टीसीएस या कंपनीचा प्रतिनिधी.

१६) ॲक्सेंचर या कंपनीचा प्रतिनिधी.

१७) सर्व जिल्हाधिकारी.

१८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

२०) निवडनस्ती-आयु-२